# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
(शिक्षण विभाग)

क्र. 3374/शि.वि. दि. 12/11/2014.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य. शाळा,
महानगरपालिका, नागपूर.

**विषय :- 14 नोव्हेंबर "बालक दिन" साजरा करणेबाबत.**

दरवर्षीप्रमाणे साजरा होणारा बालक दिन कार्यक्रम सकाळी 9.00 वाजता रा.पै. समर्थ स्टेडीयमवर साजरा करावयाचा आहे. मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचे आवाहनानुसार **"स्वच्छ भारत स्वच्छ शाळा"** हे अभियान शाळा शाळातून राबवायचे असल्यामुळे त्या योजनेचा शुभारंभ नागपूर नगरीचे प्रथम नागरीक मा. महापौर श्री. प्रविणजी दटके यांचे हस्ते होणार आहे. दि. 11.11.2014 च्या बैठकीतील सूचनेनुसार सदर कार्यक्रमात रा. पै. समर्थ स्टेडीयमच्या जवळच्या गांधीबाग झोनमधील सर्व प्राथ. / उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना सर्व शिक्षकांसह उपस्थित रहावे तसेच उर्वरित शाळेतील 20 विद्यार्थी व दोन शिक्षकांना विद्यार्थी घेऊन कार्यक्रमात उपस्थित रहाणे.अनिवार्य आहे. कार्यक्रम सुरू होण्याच्या, अर्धा तास आधी विद्यार्थ्यांना उपस्थित ठेवावे. शाळेत विद्यार्थ्यांना सकाळी बोलावून पंडीत नेहरूच्या प्रतिमेस माल्यार्पन करून छोटेखानी कार्यक्रम घ्यावा तसेच विद्यार्थ्यांना कार्यक्रम स्थळी आणण्याची व्यवस्था करावी. विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मैदानावर कोठेही मैदान अस्वच्छ होईल असे कृत्य करणार नाही अश्या सूचना द्याव्या.

शिक्षणाधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर

PC:2/D/Reshma/Letter 2.doc